

# व्यक्ती-वल्ली - ग्रेसफुल राजश्री कुलकर्णी













नमस्कार,

राजश्रीची व आमची ओळख कांही वर्षांपूर्वी एका गाण्याच्या खाजगी कार्यक्रमात झाली होती. त्यानंतर योगायोगाने आमची व राजश्रीची अनेक ठिकाणी भेट होत गेली. दुर्मिळ जुनी गाणी आणि रंगदीप दिवाळी अंक हा आमच्या श्रवणीय व सुगंधित स्नेहाचा/मैत्रीचा जुळलेला धागा होता. तसेच, अधूनमधून फोनवर आमचा मोकळेपणाने संवाद होत असे. आणि ध्यानीमनी नसतांना या सर्व आनंदात अचानक अंगावर शहारे आणणारा नीलिमा कुलकर्णीचा लोकसत्तेमधील 'हेड शेव्हिंग पार्टी' हा धक्कादायक लेख वाचनात आला. त्यात लिहिलं होतं, *"पण आजचा राजश्री कॉल वेगळ्याच मूडमध्ये सुरू झाला. मावशी, माझा मॅमोग्राम पॉझिटिव्ह आलाय. बाकीही टेस्ट झाल्या. मला ब्रेस्ट कॅन्सर झालाय...' राजश्री सांगत होती... ''दुसऱ्या किमोनंतर केस जातात. जाणार तर आहेतच. But, I want it to happen, the way I want. फेसबुकवर माझा शेव्हिंग केलेला फोटो पाहून दोन चारजणींना जरी मॅमोग्राम काढून बघावासा वाटला तरी ही 'हेड शेव्हिंग पार्टी' यशस्वी झाली असं मला वाटेल. लोकांमध्ये 'अवेअरनेस' यायला पाहिजे.''* - इति राजश्री. हे वाचून अनेक विचारांनी मन बेचैन झालं, कांही सुचेनासं झालं व माझ्या डोळ्यात पाणी आलं...



*हेड शेव्हिंग पार्टीच्या वेळी: १) राजश्री व मुलगा कौस्तुभ... २) राजश्री... ३) नीलिमा कुलकर्णी सोबत राजश्री... ४) ग्रेसफुल राजश्री... खाली: किमोथेरपीच्या काळात १) कौस्तुभ, राजश्री व पती राजेश... २) राजश्री... ३) राजेश, राजश्री व कौस्तुभ...*



मंडळी, राजश्री कुलकर्णी म्हटलं की डोळ्यासमोर सकारात्मक वृत्तीची धाडसी, अष्टपैलू, कर्तबगार, हुशार, उत्साही, कलागुणी, आनंदी, प्रसन्न, हसरं व सुस्वरूप व्यक्तिमत्व त्वरित डोळ्यासमोर येतं. त्यानंतर रंगदीपमध्ये प्रकाशित झालेला 'माझा पुनर्जन्म' हा राजश्रीचा अप्रतिम, वैचारिक व प्रभावी लेख वाचनात आला. तो वाचल्यानंतर राजश्रीवर चार शब्द लिहिण्यासाठी मी जेव्हा विचार केला तेव्हा मनात विचार आला की, या सकारात्मक वृत्ती असलेल्या सुंदरीच्या जीवनात डोकावून पाहावं. तिच्या वैभवी महासागरात डोकावतांना मला स्वयंभू असे रत्नखचित हिरे-माणिक-मोतीच मिळणार आहेत याची पूर्ण खात्री होती. *'सकारात्मक विचार करणाऱ्यांची प्रगती लवकर होताना दिसते. त्याउलट नकारात्मक विचार करणाऱ्यांना खूप अडचणींना सामोरं जावं लागतं.'* कदाचित या यातनांतून जातांना राजश्रीला हे कळलं असेल कां, असे नाना विचारही मनी आले. म्हणजे, ज्या वयात आनंदोत्सव

साजरे करायचे असतात त्या तरुण वयात हिला या भयानक परिस्थितीतून जावं लागणार या भावनेने ती खचून गेली नाही. मंडळी, केवढं हे धैर्य..! थोडक्यात, तिच्या शब्दकोशात आळस, दुःख अथवा भिती हे वाक्प्रचार (कदाचित भीतीने) अजिबात येत नाहीत. किंवा नसतीलही. हे निश्चित. त्यामुळे तिच्या अंतरंगात डोकावून पाहावे ही प्रामाणिक इच्छा मनी जागृत कां झाली व माझी मयूरपंखी लेखणी अभिमानाने कां सरसावली ते पुढे वाचून कळेलच...
मराठी विश्वाच्या साहित्यविश्व या द्वैमासिकाची राजश्री संपादक होती, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्ताची सहसंपादिका होती, तिने Hidden Gems च्या HG Insider या त्रैमासिकांसाठी दोन वर्षे संपादक आणि एक वर्ष सहसंपादक म्हणून काम केलंय.



*१-२-३-४) छायाचित्रप्रेमी ग्रेसफुल राजश्री... ५) कुटुंबासोबत... फोटोग्राफर बैजू पाटील.*

तसेच, राजश्रीने महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्क आणि मराठी विश्व न्यू जर्सी या दोन्ही मंडळांनी एकत्रितरित्या सुरु केलेल्या दोन दर्जेदार रंगदीप दिवाळी अंकाचं यशस्वीपणे संपादन केलं होतं. त्याचप्रमाणे, त्या अंकासाठी ती सर्वक्षेत्रात आजही सक्रिय मदत करीत आहे आणि करीत असते. याची मला पूर्णपणे जाणीव आहे. आमचा फोनवरून अनेकदा मोकळा संवाद होत असतो. बहुतेकवेळी, *"जयंतकाका, तुम्ही व वीणाताई कसे आहात, बऱ्याच दिवसात आपलं बोलणं झालं नाही. अशी चौकशी करून तुम्हाला वेळ असेल तर मला तुमचा सल्ला हवायं. तुमची मदत किंवा प्रतिक्रिया काय आहे, हे जाणून घ्यायचंय..."* अशी सुरुवात होते. मग, बराच वेळ संभाषण चालू राहतं. यात आपुलकीने सौम्य भाषेत प्रश्न विचारणं, मी काय बोलतोयं अथवा सल्ला

देतोय हे नीटपणे ऐकणं आणि त्यातून बोध घेणं हाच त्यामागील राजश्रीचा प्रामाणिक हेतू असतो. थोडक्यात, विविध विषयांवर होणारा आमचा अनौपचारिक संवाद अत्यंत सुखाचा असतो. हे येथे लिहिण्याचं महत्वाचं कारण असं की, दुर्दैवाने आजकाल अनुभवी लोकांचा सल्ला घेणं, त्यांना आदर देणं, विचारणं ही परंपरा सध्या दुर्मिळ होत चालली आहे. तसेच, मागे वळून इतिहास काय आहे तो बघायला, वाचायला अथवा जाणीव करून घ्यायला या दुनियेत कुणालाही फुरसत नाहीये. मात्र, राजश्री त्याला पूर्णपणे अपवाद आहे. हे मी ठामपणे व अभिमानाने येथे नमूद करतो. माझ्या मते यासाठी रंगदीपची एक (नसल्यास) स्थायी समिती असावी. आणि मराठी साहित्य क्षेत्रात सर्व विभागात उत्तम अनुभव असलेल्या समर्थ राजश्रीकडे त्या समितीची मुख्य सूत्रे असावीत. तिच्या सोबत काम करायला तिचे सवंगडी आनंदाने तयार होतील, अशी माझी पूर्ण खात्री आहे. यात कुठलीही अतिशयोक्ती नाही. कारण, हल्लीच्या धावत्या जगात नवं-तरुणांचं वैचारिक विश्व व वातावरण तांत्रिकदृष्ट्या झपाट्याने बदललेलं आहे. आणि ही तरुण मंडळीच ते तंत्र आत्मसात करायला समर्थ आहेत. तेव्हा, सध्याच्या 'व्हर्चुअल वर्ल्ड' मध्ये आम्ही बसत नसलो तरीही आमच्यासारख्या ज्येष्ठ व अनुभवी मंडळींचा सल्ला हा निःसंकोच असणार यात शंका नाही...




*१) न्यू यॉर्कमधे ४० मैल सायकलिंग... २) विंटर हाईक... ३) किमो-सर्जरी-रेडिएशन उपचार संपल्यानंतरचा आनंद व्यक्त करतांना... ४) TCS NYC मॅरथॉन धावण्याची तयारी करतांना (bib pickup)...*

या धाडसी मुलीने काय केलं नाहीये असा प्रश्न मला नेहमी पडतो. बरं ही एक उत्तम लेखक, संपादक, कवी, सूत्रधार, निवेदक, मुलाखतकार व समाजसेविका म्हणून २४/७ कार्यान्वित आहे. आणि त्याव्यतिरिक्त असं कुठलंच क्षेत्र नाही की, राजश्रीने त्यात उडी मारली आणि ती यशस्वी झाली नाही. मध्यंतरी राजश्री व तिच्या कवयित्री बहिणीने, जयश्री अंबासकरने, 'आम्ही दोघी' हा दोन भागात सादर केलेला परिश्रमपूर्वक काव्य वाचन व गीतांचा अप्रतिम व्हर्चुअल कार्यक्रम सर्वदृष्ट्या अत्यंत श्रवणीय व प्रेक्षणीय होता.

तिच्या जीवनाचा आराखडा पहिला तर तुम्हाला दिसून येईल की, तिने आता पर्यंत निरनिराळ्या राज्यात तेरा पेक्षा जास्त हाफ मॅरॅथॉन्स पूर्ण केले आहेत. येथे न थांबता तिने न्यू यॉर्क शहरात होणारी २६ मैलांची ऐतिहासिक जागतिक मॅरथॉन एका दमात पूर्ण केली आहे. पुढचं वाचल्यावर तर तुम्ही चक्क उडाल... कदाचित विश्व किती छोटं आहे ते पाहण्यासाठी गरुड झेप घेणाऱ्या राजश्रीने स्काय डायव्हिंगही केलयं. आहे की नाही कमाल..! हायकिंग-ट्रेकिंग, अनेक मैल चालणं-धांवणं, सायकलिंग, योगासनं व नियमित व्यायाम करणं वगैरे तर ती नित्याने करीत आहेच. हे ऐकल्यावरच कुणालाही घाम येऊन दम लागेल यात शंका नाही. आळसा वरून आठवलं. दिवस, दुपार, रात्र, पाऊस, बर्फ, वारे इत्यादी सर्व वातावरणात राजश्रीने अनुभवासाठी हायकिंग-ट्रेकिंग केलं आहे. आणि त्यासाठी



*स्काय डायव्हिंग: १) Tandem skydiving करतांना... व २) १५०० फुटांवरून उडी मारण्याच्या तयारीत राजश्री... ३) राजश्रीची अविस्मरणीय पंढरपूर वारी- दिंडी क्रमांक चार... ४) रथापुढे राजश्री व सोबत चित्रा भावे...*

*खाली: १-२-३) निसर्गप्रेमी राजश्री, at the top of the mountain...*



किंवा त्याआधी योग्य अशी कुठली तयारी अथवा काळजी घ्यावी लागते त्याबद्दल रंगदीप २०२०च्या दिवाळी अंकात एका लेखात सविस्तरपणे मुद्देसूद लिहिलं आहे. परंतु, या महत्वाकांक्षी व खिलाडूवृत्तीच्या सुंदरीला आत्मशक्ती, आत्मबळ, जिद्द वगैरे दैवी शक्ती कुठून मिळते या प्रश्नाचं उत्तर जर तिला विचारलं तर ती म्हणते,*"जयंतकाका, पाठराखण करणाऱ्या त्या अनाकलनीय दैवी शक्तीवर माझा खूप विश्वास आहे. माझं कुटुंब आणि मित्रमैत्रिणी माझ्या पाठीशी आहेत. हा भक्कम आधार आहे. तसेच, तुमच्यासारख्या वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद हेच माझं पाठबळ आहे."* यापुढे जर धैर्यवान राजश्रीने माउंट एव्हरेस्ट शिखर गाठलं आणि नासातर्फे अंतराळात भरारी मारली तर मला नवल व आश्चर्य वाटणार नाही. न जाणो, कदाचित ती त्याच्याही तयारीत असेल... असो. म्हणतात, कवीला तिसरा डोळा असतो. ते खरं आहे. त्यानंतर मी राजश्रीला सहज विचारलं *"काय गं, चित्तथरारक*

*स्काय डायव्हिंग करतांना तुला कवी प्रदीपने लिहिलेलं 'मशाल' या चित्रपटातील बर्मनदाने स्वरबद्ध केलेलं, 'उपर गगन विशाल, नीचे गहरा पाताल, बीचमे धरती वाह मेरे मालिक तुने किया कमाल...' हे कल्पनाशील गाणं आठवलं असेल नां."* त्यावर दूरदृष्टी असणारी राजश्री म्हणाली, *"जयंतकाका, You said it... त्यासाठी मला ते गाणं माझ्या iPod वरून ऐकतांना पुनः स्काय डायव्हिंग करायचंय. म्हणजे मी त्याहीपलीकडे जाऊन या विशाल विश्वाचा अनुभव घेईन..."* हे ऐकूनच आश्चर्य न वाटतां भितीने माझ्या अंगावर कांटा उभा राहिला होता...

मंडळी, तुमचा विश्वास बसणार नाही, अमेरिकेत इतकी वर्षे राहणाऱ्या राजश्रीला भारतातील पायी वारी जमेल की नाही, अशा प्रेमयुक्त काळजीपायी आक्षेप घेणाऱ्या सगळ्यांच्या नकारात्मक प्रतिक्रिया ऐकूनही आमच्या राजश्रीने 'न्यू जर्सी ते पंढरपूर' वारी पूर्ण केली होती. या विलक्षण प्रवासात तिने खरोखरीत अनेक व्यक्तींच्या रूपात 'विठ्ठल' दर्शन घेतलंय. २६० किलोमीटर्सचा 'आळंदी ते पंढरपूर' हा पायी प्रवास तिने सलग १८ दिवसात केला आहे. म्हणजे, सरासरी दररोज तिची २० ते २२ किलोमीटर्स तिची चाल झाली होती. हे सर्व केवळ 'विठ्ठल' दर्शनासाठी बरं कां...
हे ऐकून मी तर मनात हात जोडून चक्क तिच्या पायाच पडलो होतो..! शिवाय तिचं कौतुक असं की, या विठ्ठलवारीचं बृहन्महाराष्ट्र वृत्तामधून तिने 'मी विठ्ठल पाहिला..!' या शीर्षकाखाली न कंटाळता तिने त्वरित अप्रतिम प्रदीर्घ सचित्र लेखमाला लिहून काढली होती. आणि ती एकोणवीस लेखांची लेखमाला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्तामधे प्रकाशित झाली होती. त्यामुळे रसिक (वारकरी) वाचकांना घरबसल्या पंढरपूर वारी घडवून 'विठ्ठल दर्शना'चं पुण्य पदरी पाडलं होतं. हे पवित्र कार्य भूषणावह नव्हे कां..?

राजश्री व पती राजेश हे दोघेही संगीतप्रेमी आहेत. ते 'Hidden Gems' या विना नफा या संस्थेचा महत्वाचा हिस्सा आहेत. थोडक्यात, Hidden Gems is a member-supported, non-profit organization comprised of a group of

talented singers, musicians, and volunteers who share a singular vision to make a positive difference in the lives of those who are underprivileged, facing tribulations and hardships due to circumstances beyond their control. The group’s revenues, which




*Non-profit music group:* *Hidden Gems Live Band and talented performers…*

come from public fundraisers and paid private performances, are used to provide monetary support for other non-profit organizations that serve many worthy and noble causes. हे कौतुकास्पद आहे.


प्रतिभावंत राजश्रीचा मित्र परिवार अफाट आहे. आणि तेही सर्व परोपकारी व वेगवेगळ्या क्षेत्रातील कल्पक कलाकार आहेत. कधीही राजश्रीला फोन केला तर ती कुठल्यातरी कार्यक्रमाच्या तयारीत असते, इतर कामात अथवा लिखाणात मग्न असते. किंवा आज कौस्तुभ (मुलगा) घरी आलाय म्हणून त्याला आपले निरनिराळे पदार्थ खायला करून देण्याच्या आनंदात असते. संसाराच्या सर्व जबाबदाऱ्या लीलया सांभाळणाऱ्या राजश्रीला दोन हात कसे पुरतात अथवा वेळ कसा व कुठून मिळतो हे एक प्रकारचं कोडंच आहे. माझ्या नशिबाने म्हणा, याबाबतीत माझं कधीच अडलं नाही. फोन उचलल्यावर *"जयंतकाका, तुमच्यासाठी मला भरपूर वेळ आहे, बोला ना…"* असं सांगून आमचं बोलणं चालू होतं. थोडक्यात, सर्व मामला सदैव आनंदी, उत्साही व प्रसन्न असतो. इंद्रधनुष्याच्या सातही रंगात रमून जाणारी ही छांदिष्ट राजश्री, आपल्या सभोंताच्या सान्निध्यातील निसर्गाचा व सर्व ऋतूंचा मनोसोक्त

आस्वाद घेणारी आहे. मग, दोन डोळ्यात न मावणाऱ्या दृष्यांची अथवा दृष्टीआडच्या सृष्टीतील असंख्य छायाचित्रं काढणे व व्हिडीओग्राफी करणे हाही तिचा एक मनपसंत छंद आहे. मग, त्या मुक्तछंदाचं रसभरीत वर्णन ऐकणं किंवा त्याबद्दलचं वाचणं म्हणजे एक प्रकारची हमखास मेजवानी-ट्रीट असते. त्यामुळे मला वाटतं, २०२२ मध्ये न्यू जर्सीत मराठी विश्व तर्फे साजरा होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाच्या निवेदनाची सर्व सूत्रं राजश्रीला मिळावीत असं माझं स्पष्ट मत आहे. नव्हे माझी तशी विनंती आहे.

राजश्रीने न्यू जर्सीच्या मराठी विश्व संस्थेच्या कार्यकारिणीमध्ये २००८ ते २०११ कार्यभार सांभाळला होता. श्रीधर फडके, आनंद भाटे यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाचं आणि निरनिराळ्या क्षेत्रातील बऱ्याच उल्लेखनीय कार्यक्रमांचं निवेदनही तिने केलंय. त्यामध्ये अतिशय गाजलेला आणि लोकप्रिय कार्यक्रम म्हणजे, वैभव जोशी आणि



*१) थोर जेष्ठ साहित्यिक अनिल अवचट यांच्याशी गप्पा मारतांना राजश्री... २) देवकी पंडीत व राजश्री यांची अनौपचारिक धावती भेट... ३) संदीप खरे व वैभव जोशी यांच्या 'इर्शाद' कार्यक्रमाच्या वेळी... खाली. निवेदन करताना: १) घाणेकर गणपती... २) संपादक या नात्याने 'रंगदीप२०१९' प्रकाशन समारंभ... ३) संगीतमय 'चैत्रपालवी'... ४) क्लब ५५ ऑनलाईन कार्यक्रम...*



संदीप खरे यांचा 'इर्शाद'. हे सर्वश्रुत आहे. तसेच, अनेक दिग्गज कलाकाराच्या मुलाखतीही राजश्रीने घेतल्या आहेत. त्या अशा: अश्विनी भावे, अनिल अवचट व वसंत लिमये. हे सर्व अभिनंदनीय व वाखाणण्यासारखे आहे. *So, proud to say that, Rajeshree is the most valuable asset in our Marathi community, especially in cultural activities and literature...*

नीलिमा कुलकर्णीने लिहिलेल्या 'हेड शेव्हिंग पार्टी'च्या लेखात तिने शेवटी लिहिलंय, *"राजश्रीच्या पार्टीत तिचा मेडिकलला असणारा मुलगा कौस्तुभ यानेही मुंडन केलं. दोघंही सुंदर दिसत होते.*

*एका कॅन्सरमुक्त स्त्रीने लिहिलं आहे, 'डोकं तुळतुळीत केल्यावर माझ्या लक्षात आलं, हे केस म्हणजे मी नाही. मी म्हणजे या बाह्य सौंदर्यापेक्षा बरंच काही आहे. हेड शेव्हिंगने मला अंतर्मुख व्हायला शिकवलं.' कॅन्सर म्हणजे the emperor of all maladiesl..! सर्व दु:खांचा सम्राट..!!*

*त्याच्याशी झुंज घेणारी ही झाशीची राणी..! हेड शेव्हिंग पार्टीचे तेच यश आहे. ही कथा आहे जिद्दीने पुढे जाण्याची, खूप शिकण्याची, इतरांना शिकवण्याची.. आणि अंतर्मुख होण्याचीही..!"* आज राजश्री पूर्णपणे कॅन्सरमुक्त आहे. विक्रमादित्याप्रमाणे सर्व लढाया तिने यशस्वीपणे व आनंदाने जिंकल्या आहेत. आज असं कुठलंच कलाक्षेत्र नाही तेथे राजश्री नाही. परवाचचं उदाहरण घ्या. मराठी विश्व व क्लब ५५





*१) मराठी विश्व अध्यक्ष अशोक चौधरी, श्री ठाणेदार Michigan House of Representatives District 3, राजश्री, रंगदीप संपादक/सल्लगार छाया अराणके, मराठी विश्व अध्यक्ष स्मिता साठे...*

*२) ज्ञानेश्वर मुळे Ambassador Dnyaneshwar Mulay, Consul General of India यांच्यासोबत राजश्री...*

*३) जयंत, राजश्री व वीणा कुळकर्णी...*

तर्फे सादर झालेला नवोदित व प्रतिभावान कलाकारांचा विविध करमणुकीचा Virtual Holiday Partyचा सुंदर कार्यक्रम झाला. त्याचं मुद्देसूद व थोडक्यात निवेदन आमच्या Graceful राजश्रीने उत्तमपणे केलं होतं. त्यामुळे तो अधिक उठावदार झाला होता यात शंका नाही. थोडक्यात, राजश्रीच्या बुद्धिमत्तेचं प्रतिबिंब तिच्या सौंदर्यातून अधिकच खुलून दिसतं. हेही तितकचं खरं. अशा या कर्तबगार राजश्रीच्या colourful जीवनावर एक दर्जेदार बोलका लघुपट तयार होणं व उत्तम छायाचित्रांचं कॉफी टेबल बुक एकाचवेळी प्रकशित होणं अत्यंत जरुरीचे आहे. आणि हे मी तिला अनेकदां सुचविलंही आहे. कदाचित तिला वेळ मिळाला अथवा तिने काढला तर तेही साध्य करणं तिला सहज शक्य आहे. याची तिलाही कल्पना आहे. कारण, 'नाही' हा शब्द या सकारात्मक वृत्तीने जगणाऱ्या सुंदरीच्या शब्दकोषात अजिबात नाहीये...
राजश्रीच्या सगळया उपक्रमांना तिचे पती 'राजेश' यांचा खंबीरपणे पाठींबा व आधार असतो. संगीतशौकीन राजेश हे IT professional असून एका नामांकित इन्शुरन्स कंपनीत व्यवसाय करतात. अत्यंत हुशार मुलगा 'कौस्तुभ' हा Mount Sinai, New York sponsored by NIH (National Institute of Health) मधून MD-PhD करतोय. तो Cell Biology & Neuroscience या विषयांमधील पदवीधर आहे. तो जेव्हा Undergraduate करीत होता तेव्हा त्याला चारही वर्षे न्यू जर्सीच्या 'रटगर्स' या स्टेट युनिव्हर्सिटी कॉलेज मध्ये ट्युशन आणि डॉर्म अशा दोन्हीही ठिकाणी पूर्ण स्कॉलरशिप मिळाली होती..! तसेच, Kaustubh is a musician. He can play Saxophone, piano, tabla and guitar. Hidden Gems च्या बऱ्याच live कार्यक्रमांमधे त्याचा सहभाग असतो. शिवाय संसार, सामाजिक व कलाक्षेत्र सांभाळून 'राजश्री' एका वैद्यकीय ऑफिसमध्ये पार्टटाईम नोकरी करते. म्हणजे, पार्ट टाइम नोकरी व फुल टाइम सोशल वर्क असं म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही. हे सर्व भूषणावह व कौतुकास्पद आहे...
राजश्रीने 'माझा पुनर्जन्म' या लेखात शेवटी लिहलं *आहे, "प्रतिकूल परिस्थितीतही निराश न होता, सकारत्मक कसं राहावं ही निसर्गाची शिकवण लक्षात ठेऊन, नवीन*

*उगवता प्रत्येक दिवस, प्रत्येक क्षण मी समरसून जगते आहे आणि साजरा करते आहे... माझ्या पद्धतीनं..! ...आणि मला खरचं धन्यता वाटते कारण सुदैवाने माझ्या या 'जगण्याच्या उत्सवात' माझा जीवनसाथी, माझे कुटुंबीय आणि मित्रमंडळी हे देखील सामील असतात."* असं राजश्री नम्रतेने म्हणते. आणि बोलतांना राजश्री नेहमी म्हणते,*"जयंतकाका, मला अजून खुप-खूप काम करायचंय..."* अशी सदैव प्रबळ इच्छा बाळगणाऱ्या ग्रेसफुल राजश्रीला उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य लाभो आणि यापुढेही अनेकोत्तम यशस्वी कार्य तिच्याकडून घडो अशी सदीच्छा मी येथे व्यक्त करतो... असो.

मंडळी, प्रतिभेच्या सूर्यप्रकाशात न्हातांना आमच्या विनयशील राजश्रीला कधीही बिलोरी आरश्याची गरज भासणार नाही हे जरी खरं असलं तरी, एखाद्या मानसशात्रज्ञाने जर आमच्या सहृदयी राजश्रीच्या 'आनंदाची' व्याख्या तपासून पाहायची ठरविली तर तो निश्चित म्हणेल, *"प्रथम तुम्ही यावर्षी प्रकाशित झालेल्या विश्वविख्यात Time Magazine मधील जयंत कुळकर्णी यांनी ग्रेसफुल राजश्रीवर लिहिलेली 'Woman of The Year' ही Cover Story वाचा. त्यात जयंतने जो 'कानमंत्र' दिला आहे, तोच यावर एकमेव उपचार आहे."* आणि त्याजागी जर मी तेथे असलो तर निश्चित म्हणेन, *"My Hats Off To You Rajeshree..!"*

आपला,

जयंत विठ्ठल कुळकर्णी.

Res: 718-565-5720

jvkny1@gmail.com

ता. क: या लेखासाठी मला राजश्रीने सर्वदृष्ट्या मदत केली व पूर्णपणे सहकार्य दिलं यामुळे हे अवघड काम सोपं झालं यात शंका नाही. त्याबद्दल मी तिचा मनःपूर्वक आभारी व ऋणी आहे.

कृपया, 'चित्रमय स्वगत - ग्रेसफुल राजश्री कुलकर्णी' हा भाग खाली पाहावा. धन्यवाद.

---

# चित्रमय स्वगतः ग्रेसफुल राजश्री कुलकर्णी





*१) Tandem Skydiving - १५००० फुटांवरून स्काय डायव्हिंगचा अविस्मरणीय अनुभव घेणारी राजश्री...*








१) सुप्रसिद्ध कवयित्री बहीण, जयश्री कुलकर्णी-अंबासकर-राजश्री... २-३-४) प्रत्येक क्षण समरसून जगणारी, आनंदी आणि सकारात्मक राजश्री...



१) आदरणीय शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्यासोबत व २) लिटिल मास्टर सुनील गावस्कर आणि राजश्री-राजेश... ३) 'बाबूजी आणि मी' या कार्यक्रमाच्या प्रॅक्टिसच्या वेळी संगीतकार श्रीधर फडके- निवेदक राजश्री (सुहास-अलका पै यांच्या निवासस्थानी)... ४) कलावैभवी डॉ. मीना नेरुरकर सोबत राजश्री...



१) पद्मश्री संतूरवादक सतीशजी व्यास, सोबत त्यांच्या पत्नी रेखा व्यास (राजश्रीच्या निवासस्थानी)... २) सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे (राजश्रीच्या निवासस्थानी)... ३) गिर्यारोहक-साहित्यिक वसंत वसंत लिमये यांची मुलाखत घेताना... ४) Ambassador Dnyaneshwar Mulay, Consulate general of india, NY येथील  महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमाचं निवेदन करताना Consul General of India ज्ञानेश्वर मुळे यांच्यासोबत...



*१) साऊथ ब्रुन्सविक येथे २५ मैल सायकलिंग करताना... २) फिलाडेल्फिया येथे हॅलोविनच्या दिवशी हाफ-मॅरॅथॉन पूर्ण केल्याबद्दल आणि एका आठवड्यात ३ हाफ-मॅरेथॉन पूर्ण केल्यामुळे अजून एक पदक मिळालेली हॅलोविन पोषाखातली राजश्री... ३) न्यू यॉर्क मध्ये ४० मैल सायकलिंग (FiveBoroBikeTour) करताना मैत्रीण सीमा पारखी आणि राजश्री...*



*१-२-३-४) न्यू यॉर्क, पेन्सिल्व्हेनिया, व्हर्जिनिया, नेवाडा आणि न्यू जर्सी येथील निरनिराळ्या स्थानी मिळालेली मॅरॅथॉन्स, सायकलिंग, निधी जमावण्याबद्दल राजश्रीला मिळालेली गौरवपूर्ण पदकं...*




*१-२-३-४) २०१५ मधे "ब्रेस्ट कॅन्सर या जीवघेण्या व्याधीवर उपचार व्हावे" यासाठी 'AVON39' या संस्थेसाठी निधी गोळा करताना (दोन दिवसात ३९ मैलांचा walk करताना) मैत्रीण अनघा येरंडे आणि राजश्री आणि २०१६ मधे याच कारणासाठी फिलाडेल्फिया येथे 'Susan G Komen' या संस्थेसाठी निधी गोळा करताना (३ दिवसात ६० मैल चालणारी) राजश्री...*

*१) रंगदीप संपादक-साहित्यक नीलिमा कुलकर्णी, रवी कुलकर्णी आणि ग्रंथाली पब्लिकेशन्सचे सुदेश हिंगलासपूरकर... २) मराठी विश्वच्या दिवाळी कार्यक्रमाच्या वेळी सुप्रसिद्ध संगीतकार श्रीधर फडके यांचा 'बाबूजी आणि मी' हा कार्यक्रम करताना, तबलावादक तुषार आग्रे, सुप्रसिद्ध दंतचिकित्सक जान्हवी राणे, मराठी विश्व विश्वस्त नितीन आपटे, मराठी विश्व अध्यक्ष निरंजन देव आणि कार्यक्रमातील सहकारी कलाकारांसोबत राजश्री...*





*१) आनंद गंधर्व 'आनंद भाटे' यांच्या कार्यक्रमाचं निवेदन करताना भरत कामत, राजश्री, आनंद भाटे, सादर नायक... २) मराठी विश्व च्या ४० वर्षीच्या वर्धापन दिनी 'चैत्रपालवी' या कार्यक्रमाचं निवेदन करताना सहकारी कलाकार मधुकर क्षीरसागर, श्रुती देशपांडे, वैशाली गोडबोले, अक्षय अणावकर, भक्ती पुरंदरे, पुष्कर गाडगीळ, राजश्री, आशिष शानबाग...*



*१) अभिनेत्री अश्विनी भावे यांच्याशी 'कदाचित' चित्रपटविषयी मुलाखत घेताना... २-३) या सेवाभावी संस्थेच्या वेळी केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग (सोबत ऋतुजा फडके)...*

*१) 'उभ्या उभ्या विनोद' आणि मराठी विश्व कार्यकारिणीतील इतर सभासद... २) रंगदीप २०१९च्या प्रकाशनाच्या वेळी: डावीकडून अनघा येरंडे, राजश्री, चाणक्य मंडळ परिवार संस्थापक अविनाश धर्माधिकारी, मराठी विश्व अध्यक्ष निरंजन देव, मराठी विश्व उपाध्यक्ष अतुल आठवले, महाराष्ट्र मंडळ अध्यक्ष किनी प्रभाकर...*